मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले

उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ | अंक : ३०० | सोमवार, १३ जुलै २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ४ | RNI MAHMAR/2023/89514

त्वरित पत्रकार पाहिजेत !
महाराष्ट्र व देशासह जगभरात डिजिटल माध्यमातून पोहचणारे दैनिक
PRESS
दैनिक युवक आधार मराठी
महाराष्ट्रातील सर्व जिल्हे,तालुका, जिल्हा परिषद सर्कल,लोकसभा, विधानसभा या क्षेत्रांमध्ये पत्रकार पाहिजेत
अधिक माहिती साठी संपर्क
श्री संतोष शिवदास आमले
संपादक - ९२२०४०३५०९

# हिमाचल-उत्तराखंडमध्ये दरडी, काश्मीरमध्ये ढगफुटी

**नवी दिल्ली :** देशभरात मान्सूनने आता जोरदार हजेरी लावली आहे. उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून डोंगराळ भागात परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये भूस्खलनाच्या घटना वाढल्या आहेत, तर जम्मू-काश्मीरमधील पहलगाम परिसरात ढगफुटीमुळे अचानक पुर आल्याने प्रशासन सतर्क झाले आहे. पुढील काही दिवसही अनेक राज्यांमध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान शनिवारी (11 जुलै) देशातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पाऊस झाला. भारतीय हवामान विभागाने हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पूर्व उत्तर प्रदेश आणि मेघालयमध्ये अतिवृष्टीची नोंद केली आहे. याशिवाय पश्चिम बंगाल,ओडिशा, बिहार, झारखंड, पंजाब, हरियाणा, मिझोराम, तामिळनाडू आणि केरळमध्येही जोरदार पाऊस झाला.

**उत्तराखंडमध्ये भूस्खलनामुळे 120 रस्ते बंद**

उत्तराखंडमध्ये सलग पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी दरडी कोसळल्या आहेत. तीन राष्ट्रीय महामार्गांसाह तब्बल 120 रास्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. यमुनोत्री राष्ट्रीय महामार्गाचा काही भाग




वाहून गेल्याने दोन दिवस वाहतूक ठप्प होती. त्यानंतर राज्य आपत्ती प्रतिसाद दलाने (एसडीआरएफ) बचाव मोहीम राबवत सुमारे 100 भाविकांना सुरक्षित बाहेर काढले. उत्तरकाशीतील स्यानाचट्टी येथे रस्ता पूर्णपणे बंद झाल्याने पर्यायी मार्ग तयार करून प्रवाशांची सुरक्षित सुटका करण्यात आली.

**हिमाचल प्रदेशात भूस्खलन,**

## मुसळधार पावसाचा इशारा

**पूल कोसळला**

हिमाचल प्रदेशातही पावसाचा जोर कायम आहे. शिमलामध्ये भूस्खलन झाल्याने अनेक ठिकाणी वाहतूक विस्कळीत झाली. किन्नौर जिल्ह्यात पुराचे पाणी घरांमध्ये शिरल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाले. सांगला येथे गेल्या वर्षी उभारण्यात आलेला तात्पुरता पूल कोसळल्याने परिसरातील संपर्क तुटला. प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**जम्मू-काश्मीरमध्ये ढगफुटी, पहलगाममध्ये पूर**

अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम आणि आसपासच्या डोंगराळ भागात शनिवारी सायंकाळी ढगफुटी झाल्याने अचानक पूर आला. या पूरामुळे अनेक हॉटेल्स आणि घरांचे नुकसान झाले. खबरदारीचा उपाय म्हणून पर्यटकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. प्रशासनाच्या माहितीनुसार यामध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही. तसेच या घटनेचा श्री अमरनाथ यात्रेवर कोणताही परिणाम झालेला नसून मदत आणि बचावकार्य सुरू आहे.

**हवामान विभागाचा इशारा**

भारतीय हवामान विभागाने हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू-काश्मीरसह अनेक राज्यांमध्ये पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. डोंगराळ भागात भूस्खलन आणि पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी आणि पर्यटकांनी अनावश्यक प्रवास टाळावा, तसेच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## कॅल्क्युलेटरपेक्षाही वेगवान! घाटंजीच्या हिमांशूने अमरावतीत गाजवले राज्यस्तरीय 'ॲबॅकस' मैदान

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** घाटंजीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवत, अमरावतीच्या शिवाजी महाराज ऑडिटोरियममध्ये पार पडलेल्या राज्यस्तरीय ॲबॅकस स्पर्धेत येथील 'अनिरा प्रोॲक्टिव्ह अकॅडमी'च्या विद्यार्थ्यांनी इतिहास रचला आहे. तब्बल ८०० स्पर्धकांमध्ये घाटंजीचा हिमांशू मानकर हा संपूर्ण स्पर्धेत एकमेव 'मॅथ मॅजिशियन' ठरला. त्याने ६ मिनिटांचे कठीण आव्हान अवघ्या ३.३४ मिनिटांत एकही चूक न करता पूर्ण करत सर्वांना थक्क केले. हिमांशूच्या या अद्भूत वेगाने घाटंजीचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात झळकावले आहे.




या महामुकाबल्यात अकॅडमीच्या ६० पैकी ४५ विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या श्रेणीत बाजी मारली, तर १५ बालचमूंना 'बेस्ट परफॉर्मन्स'चा बहुमान मिळाला. आर्या गायकवाड, आहिल शेख, स्वराज गिराम यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी पहिल्या पाच क्रमांकांवर नाव कोरत आपल्या बुद्धिमत्तेची चमक दाखवली, तर तन्वी बावनकसे आणि तिच्या सहकाऱ्यांनी ट्रॉफीवर आपले नाव कोरले. विद्यार्थ्यांच्या या यशासोबतच, पालकांच्या अफाट विश्वासामुळे अकॅडमीने समर बॅचमध्ये १०० हून अधिक ॲडमिशन्सचा नवा रेकॉर्ड केला असून, मुख्य संस्थेकडून १०,००० रुपयांचे रोख पारितोषिकही पटकावले आहे. या अभूतपूर्व यशाबद्दल संचालक अनिकेत भोयर सर आणि अक्षरा मॅडम यांच्यासह सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## दिंडी–पालख्यांच्या आगमनाने अहिल्यानगर शहर गजबजले; वातावरण झाले भक्तीमय

**अहिल्यानगर:** आषाढी वारीसाठी जिल्ह्यातून प्रस्थान करणाऱ्या आणि मार्गक्रमण करत पंढरपूरकडे जाणाऱ्या दिंडी-पालख्यांच्या आगमनाने शहर गजबजून गेले आहे. ज्ञानोबा-तुकोबाचा गजर, खांद्यावर भागवत धर्माची पताका, टाळ-मृदुंग-वीणेचा नाद, डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या महिला, फुलांनी सजवलेला रथ अशा दिंड्या शहरातील प्रमुख रस्त्यावरून शिस्तीने जात आहेत. त्यामुळे शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.

वारकऱ्यांसह राज्य सरकारकडून मानाचे स्थान मिळालेल्या त्र्यंबकेश्वर येथील संत निवृत्तीनाथ महाराज, पैठण येथील संत एकनाथ महाराज, जिल्ह्यातीलच असलेली संत निळोबाराय व ग्रंथराज ज्ञानेश्वरी यांच्यासह लहान मोठ्या ३०० हून अधिक दिंडी-पालखी सोहळे नगरमार्गे पंढरपूरकडे जात असतात.



या सोहळ्यातून लाखो वारकरी सहभागी असतात. शहरात आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव यांनी वारकऱ्यांचे ठिकठिकाणी स्वागत केले.

या दिंड्यांचे मार्गक्रमणाचे वेळापत्रक ठरलेले असते. शहर व परिसरात कोठे विसावा घ्यायचा, कोठे मुक्काम करायचा, याची आगाऊ माहिती संबंधित तरुण मंडळे, संस्था- संघटनांना असते. हे सर्वजण वारकऱ्यांची बाडदास्त ठेवतात. स्वागत मार्गावर कमानी उभारण्यात आल्या आहेत. वारकऱ्यांवर फुलेही उधळली जात आहेत. दिंड्यांसमवेत असलेल्या प्रमुख, महाराजांचे कीर्तन व प्रवचन सोहळेही शहरात ठिकठिकाणी रंगू लागले आहेत. गेल्या दोन-तीन दिवसापासून पावसाने उसंत दिल्याने मार्गक्रमण शिस्तीने होताना दिसत आहे.

दरवर्षी मार्गक्रमण करणाऱ्या या वारकऱ्यांचे व स्थानिक संस्था, संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचे ऋणानुबंध तयार झालेले आहेत. त्यांच्यामार्फत वारकऱ्यांच्या निवास, भोजनाची व्यवस्था केली जाते. दिंड्यांच्या मुक्कामाचे विसाव्याचे ठिकाणही दरवर्षी ठरलेले असतात. वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी, डॉक्टर संघटना, संस्थांचे पदाधिकारी यांच्या वतीने चरण सेवाही केली जाते. अनेकजण स्वयंसेवी पद्धतीने वारकऱ्यांना मदत करतात. औषधोपचाराचीही व्यवस्था केली जाते.

संत निवृत्तीनाथांच्या पालखीचे काल, शनिवारी आगमन झाले. ग्रंथराज ज्ञानेश्वरी दिंडीचे नेवासातून प्रस्थान करताना रिंगण सोहळा रंगला. पारनेरमधून संत निळोबाराय दिंडीचे दोन दिवसापूर्वी प्रस्थान झाले. शहरामार्गे जाणाऱ्या दिंड्या प्रामुख्याने नाशिक, औरंगाबाद, पाथर्डी रस्त्याने नगरमध्ये येतात. मुक्काम, विसावा करून पुढे प्रस्थान करतात. अनेक लहान मोठ्या दिंड्या पुढील दोन-तीन दिवसाच्या कालावधीत मार्गस्थ होतील.

जिल्हा प्रशासनाने दिंड्यांच्या व्यवस्थेसाठी उपजिल्हाधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अशा १५ जणांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. याशिवाय ४२ सहाय्यक नोडल अधिकारीसह महापालिका, पालिका, जिल्हा परिषद, महावितरण, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, अशा विविध विभागांच्या कर्मचाऱ्यांची पाणीपुरवठा, टॅंकर, निवास, वीज व्यवस्थेसाठी नियुक्त करण्यात आली आहे.

# विद्यार्थ्यांच्या प्रेमळ शुभेच्छांनी डॉ. नंदकुमार जाधव सर यांचा ६५ वा वाढदिवस जल्लोषात साजरा

### बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांनी स्वतः बनविलेली शुभेच्छापत्रे व भेटवस्तू देत व्यक्त केले प्रेम

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल : प्रतिनिधी :** नवीन पनवेल येथील डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचलित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेत संस्थेचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. नंदकुमार मारुती जाधव यांचा ६५ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

ढोल-ताशांच्या गजरात शाळेतील विद्यार्थ्यांनी डॉ. नंदकुमार जाधव यांचे उत्स्फूर्त आणि जल्लोषात स्वागत केले. विद्यार्थ्यांचा आनंद, उत्साह आणि सरांप्रती असलेले प्रेम यामुळे संपूर्ण शाळेचे वातावरण भारावून गेले होते. या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव श्री. एस. एस. जाधव, खजिनदार श्री. अतुल वाणी, संस्थेच्या सल्लागार समिती सदस्या सौ. सुनेत्रा वाघ, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. श्रेया जाधव तसेच १९८४-८५ च्या फिजिकल ट्रेनिंग बॅचमधील डॉ. जाधव यांचे मित्र श्री. आर. के. सावंत, श्री. मोहन















भागवत आणि श्री. रामचंद्र सूर्यवंशी यांच्यासह शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी डॉ. जाधव यांचे औक्षण केले. त्यानंतर वाढदिवसाचा केक कापून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. विशेष म्हणजे, शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. जाधव यांच्यासाठी स्वतःच्या हाताने आकर्षक शुभेच्छापत्रे आणि विविध भेटवस्तू तयार केल्या होत्या.

स्वतः बनविलेल्या भेटवस्तू डॉ. जाधव यांना देताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. विद्यार्थ्यांचे निरागस प्रेम आणि आपुलकी पाहून उपस्थितही भारावून गेले. सर्वांनी दिलेल्या शुभेच्छांचा स्वीकार करत डॉ. नंदकुमार जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

कार्यक्रमानंतर सर्वांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. स्नेहभोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. अशा प्रकारे डॉ. नंदकुमार मारुती जाधव यांचा ६५ वा वाढदिवस विद्यार्थ्यांच्या प्रेमळ सहभागाने, आनंदात आणि मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

# पाताळगंगा नदी प्रदूषण बाबतीत MPCB कडून बड्या कंपन्यांना नोटीस

## उद्योग नदी पासून दूर स्थलांतर ,सक्षम अधिकारी नेमून औद्योगिक सुरक्षा अटी नियम तपासावे

**दैनिक युवक आधार**

**रसायनी | प्रतिनिधी** : पाताळगंगा नदीपात्रात घातक रासायनिक सांडपाणी सोडून नदीचे प्रदूषण करणाऱ्या उद्योगांविरोधात अखेर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (MPCB) कठोर भूमिका घेत कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. होत असलेल्या तक्रारी पाठपुराव्यानंतर मंडळाने संबंधित उद्योगांची पाहणी करून नियमांचे उल्लंघन आढळलेल्या कंपन्यांना नोटिसा बजावल्या असल्याने बेजबाबदार औद्योगिक कंपन्याचे धाबे दणाणलेले आहेत.

**MPCB कडून कारवाई झालेल्या कंपन्या :**

१) मेसर्स द बॉम्बे डायिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लिमिटेड (पॉलिस्टर डिव्हिजन, पाताळगंगा औद्योगिक क्षेत्र)

२)मेसर्स गतिक सिंथेसिस एलएलपी (प्लॉट क्र. ई-१०१ व १०२, अतिरिक्त पाताळगंगा एमआयडीसी, रसायनी)

३) मेसर्स रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड (लॅब डिव्हिजन, प्लॉट क्र. ए-३, बी-१ ते बी-३, एमआयडीसी पाताळगंगा)

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उप-प्रादेशिक कार्यालयाने संबंधित कंपन्यांना पर्यावरणीय अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्याबाबत नोटिसा बजावत आवश्यक ती कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. या कारवाईमुळे औद्योगिक क्षेत्रात खळबळ उडाली असून, स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

दरम्यान, रसायनी औद्योगिक परिसरात अनेक उद्योगांकडून प्रदूषण नियंत्रण, औद्योगिक सुरक्षा आणि




पर्यावरणीय नियमांचे काटेकोर पालन होत नसल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत.बिर्ला कार्बन,आसमी मेटल,हानील इरा सारख्या कंपन्या मोठया प्रमाणात वायू प्रदूषण करत असल्याच्या कथित तक्रारी अनेकदा समोर येत असतात पण कालांतराने यावर कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने मानवी आरोग्यावर मोठी समस्या येण्याची चिंता व्यक्त केली जात असते.

प्रदूषण, औद्योगिक अपघात आणि सुरक्षा नियमांच्या अंमलबजावणीत संबंधित विभागांकडून प्रभावी देखरेख ,सूचना ,आदेश होत नसल्याने तक्रार घेणारे काही बेजबाबदार अधिकारी स्वतःहून कारवाई करताना दिसत नसल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.

पत्रकार,पर्यावरणप्रेमी आणि सामाजिक संघटनांनी मागणी केली आहे की, नदी, जल, वायू आणि पर्यावरण प्रदूषण करणाऱ्या उद्योगांवर केवळ नोटिसांपुरती कारवाई न करता पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत कठोर दंडात्मक कारवाई करावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करून मोठा आर्थिक दंड आकारावा, तसेच पाताळगंगा नदीपात्रालगत असलेल्या प्रदूषणकारी उद्योगांचे टप्प्याटप्प्याने स्थलांतर करण्याचाही विचार करावा.

याचबरोबर प्रदूषण नियंत्रण, औद्योगिक सुरक्षा, वीज वितरण आणि संबंधित शासकीय विभागांमध्ये सक्षम व कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची नियुक्ती करून नियमित तपासण्या करण्यात याव्यात. कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

स्थानिक ग्रामपंचायतीच्या गावातील कचरा सांडपाणी व धोकादायक टाकाऊ वस्तु थेट नदीपात्रात सोडत असल्याने नदी प्रदूषण वाढत असल्याचे एक मोठे कारण समोर येत आहे.

जगावर जल संकट असताना खालापूर तालुक्यात पिण्यासाठी पाणी नदी पात्र उपलब्ध आहे .पण त्या नदीच्या संरक्षणासाठी कोणतीही सक्षम यंत्रणा नसल्याने भविष्यात दूषित पाण्याने मानवी जीवन धोक्यात जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पाताळगंगा नदीच्या संरक्षणासाठी सुरू झालेल्या या लढ्याला स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि पत्रकार, विविध सामाजिक संघटनांचा वाढता पाठिंबा मिळत असून, प्रदूषणमुक्त पाताळगंगेसाठी पुढील काळातही आंदोलन आणि पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना यू.एन.डी.पी. अंतर्गत भात बियाण्यांचे वाटप

# पनवेल तालुका कृषी विभागाचा दिलासादायक उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** यंदाच्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे पनवेल तालुक्यातील अनेक गावांमध्ये भात बियाण्यांची पेरणी बाधित झाली असून मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. पावसाच्या सततच्या तडाख्यामुळे अनेक शेतकऱ्यांना पुन्हा पेरणी करण्याची वेळ आली. ही परिस्थिती लक्षात घेऊन पनवेल तालुका कृषी विभागाने तातडीने पुढाकार घेत यू.एन.डी.पी. अंतर्गत भात बियाण्यांची मागणी केली.

पनवेल तालुका कृषी विभागाच्या या मागणीनुसार महाबीजकडून भात बियाणे उपलब्ध करून देण्यात आले. त्यानंतर गुळसुंदे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकरी बांधवांना भात बियाण्यांचे वाटप करण्यात



आले. या उपक्रमामुळे अनेक शेतकऱ्यांना पुन्हा पेरणी करण्यासाठी आवश्यक बियाणे उपलब्ध झाले असून त्यांच्या आर्थिक अडचणी काही प्रमाणात कमी होण्यास मदत झाली आहे.या संपूर्ण उपक्रमात पनवेल तालुका कृषी अधिकारी श्री. हेगडे यांनी नियोजनबद्ध पद्धतीने मार्गदर्शन केले. कृषी पर्यवेक्षक प्रसाद पाटील यांनी शेतकऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवून बियाणे वितरणाची प्रक्रिया सुरळीत पार पाडली. तसेच गुळसुंदे येथील कृषीभूषण पुरस्कार प्राप्त प्रगतशील शेतकरी मिनेश गाडगीळ यांनी स्थानिक स्तरावर समन्वय साधत शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. याशिवाय गुळसुंदे ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच मीनाक्षी जगताप तसेच ग्रामपंचायत लेखनिक नंदकुमार नवरंगे यांनी लाभार्थी शेतकऱ्यांची माहिती संकलित करणे, वितरणाचे नियोजन करणे आणि आवश्यक प्रशासकीय सहकार्य उपलब्ध करून देणे यामध्ये मोलाची भूमिका बजावली.यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी शासन, कृषी विभाग आणि महाबीज यांनी केलेल्या तातडीच्या मदतीबद्दल समाधान व्यक्त केले. नैसर्गिक आपत्तीमुळे निर्माण झालेल्या संकटाच्या काळात वेळेवर उपलब्ध झालेल्या भात बियाण्यांमुळे पुन्हा पेरणी करणे शक्य होणार असल्याची भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

## खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून, उप विभाग प्रमुख दीपेश पाटील यांच्या सौज्ययाने गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी** : खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून, शिळ - देसाई शिवसेना उपविभाग प्रमुख श्री.दीपेश पाटील यांच्या सौजन्याने गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाली.

या कार्यक्रमास प्रभाग क्रमांक २९मधील नगरसेवक श्री.बाबाजी पाटील आणि नगरसेविका सौ.अर्चना पाटील यांची प्रमुख उपस्थित होती . तसेच खिडकाळी गावातील आणि आजूबाजूच्या परिसरातील बरेचसे मान्यवर तसेच वरिष्ठ नागरिक ही उपस्थित होते उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रगती करण्यासाठी शुभेच्छा देत, शिक्षण हेच उज्ज्वल भविष्य घडविण्याचे प्रभावी साधन असल्याचे सांगितले.



यावेळी विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाचे विद्यार्थी, पालक आणि स्थानिक नागरिकांनी स्वागत करत दीपेश पाटील यांचे आभार मानले. समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत मिळावी आणि कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे दीपेश पाटील यांनी सांगितले.

## नागरिकांच्या प्रश्नांवर भर व मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्याचे शिवसेना नेते अनंत गीते यांचे बैठकीत आवाहन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पनवेल येथील मध्यवर्ती कार्यालयात शिवसेना नेते तथा माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांच्या उपस्थितीत पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत संघटनात्मक बांधणी, नागरिकांच्या समस्या आणि आगामी पक्षीय उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

कामोठे येथे नगरसेविका मेघना घाडगे यांच्या कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी केलेल्या घोषणेनुसार ही बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत येत्या काही दिवसांत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या सर्व नगरसेवक आणि महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले.

यावेळी अनंत गीते यांनी नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्यासाठी पदाधिकाऱ्यांना सक्रिय राहण्याच्या सूचना दिल्या. तसेच मध्यवर्ती कार्यालयात नियमित उपस्थित राहून



नागरिकांच्या तक्रारींचा पाठपुरावा करून त्यांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य द्यावे, असे निर्देशही त्यांनी दिले. याशिवाय संघटनात्मक बळकटी, आगामी कार्यक्रम आणि विविध राजकीय विषयांवरही चर्चा झाली.

बैठकीस शिवसेना उपनेते बबनदादा पाटील, सहसंपर्क प्रमुख अनिल चव्हाण, जिल्हाप्रमुख दिपक निकम, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील व भरत पाटील, महानगरप्रमुख समाधान काशीद, गटनेत्या लीना गरड, रामदास गोवारी, प्रवीण जाधव, यतिन देशमुख, प्रभाकर गोवारी, सुनील गोवारी, विनय गोवारी, सिद्धेश चव्हाण यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आधाराचा नांगर, मायेची पेरणी!; पतीच्या निधनानंतर शेतीची धुरा सांभाळणाऱ्या दोन शेतकरी भगिनींना राहा लालसरे फाउंडेशनचा आधार

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : संकटाच्या काळात दिलेला आधार हा आयुष्याला नवसंजीवनी देणारा ठरतो, याची प्रचिती निफाड तालुक्यातील देवगाव आणि डोंगरगाव येथील दोन शेतकरी विधवा महिलांना आली आहे. पतीच्या निधनानंतर कुटुंबासह शेतीची संपूर्ण जबाबदारी खांद्यावर आलेल्या या महिलांच्या मदतीसाठी राहा लालसरे फाउंडेशनने पुढाकार घेत त्यांच्या शेतीसाठी मोफत नांगरणी, मशागत, पेरणी, बियाणे आणि रासायनिक खतांची व्यवस्था करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला.

मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मुख्य जनसंपर्क अधिकारी तथा राहा लालसरे फाउंडेशनचे अध्यक्ष नितीन लालसरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामुळे देवगाव येथील कै. महेश साबळे यांच्या पत्नी सविता साबळे आणि डोंगरगाव येथील कै. सोमनाथ



नागरे यांच्या पत्नी सोनाली नागरे यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.

देवगाव येथील शेतकरी कै. महेश साबळे यांचे ट्रॅक्टर अपघातात दुर्दैवी निधन झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबावर मोठे संकट कोसळले. घरातील कर्ता पुरुष गमावल्यानंतर शेतीची सर्व जबाबदारी सविता साबळे यांच्यावर आली. आर्थिक अडचणींमुळे शेतीची मशागत करणेही कठीण झाले होते. ही परिस्थिती लक्षात घेऊन राहा लालसरे फाउंडेशनने त्यांच्या तीन एकर शेतीची संपूर्ण नांगरणी, मशागत व पेरणी करून दिली. यासोबतच दर्जेदार बियाणे आणि आवश्यक रासायनिक खतांचीही उपलब्धता करून देण्यात आली.

त्याचप्रमाणे डोंगरगाव येथील कै. सोमनाथ नागरे यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सोनाली नागरे यांच्यासमोरही उपजीविकेचे मोठे आव्हान निर्माण झाले होते. त्यांच्या कुटुंबाची परिस्थिती ओळखून फाउंडेशनने आवश्यक कृषी साहित्य, मशागत व पेरणीची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली.

त्यामुळे आगामी हंगामासाठी त्यांच्या शेतीला नवी उभारी मिळाली आहे.

या उपक्रमामुळे दोन्ही कुटुंबांना केवळ शेतीसाठी आवश्यक मदतच मिळाली नाही, तर संकटातून सावरण्यासाठी मानसिक बळ आणि नव्या आशेचाही आधार मिळाला आहे. सहानुभूती व्यक्त करण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीतून मदतीचा हात देत राहा लालसरे फाउंडेशनने सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श निर्माण केल्याची भावना परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली. शेतकरी कुटुंबांच्या अडचणीच्या काळात अशा प्रकारचे उपक्रम ग्रामीण भागासाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे मतही अनेकांनी व्यक्त केले.

या वेळी संपत नागरे, रविंद्र शिंदे, निलेश सालकाडे, सुनील आव्हाड, दत्तू आव्हाड, कोथमिरे सर, ग्रामसेवक रणजीत निकम आदी उपस्थित होते.

फाउंडेशनच्या या उपक्रमाचे देवगाव, डोंगरगाव तसेच परिसरातील ग्रामस्थांकडून कौतुक होत असून, संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या पाठीशी उभे राहण्याच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत केले जात आहे.

## केसलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्राला आरोग्य सेवा आयुक्तांची भेट; आरोग्य सेवांचा घेतला सखोल आढावा

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी :** प्राथमिक आरोग्य केंद्र, केसलवाडा येथे आज आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) संचालक मा. श्री. संजय काटकर यांनी भेट देऊन आरोग्य सेवांचा सखोल आढावा घेतला. यावेळी आरोग्य केंद्रातील विविध सेवा, उपलब्ध सुविधा, मनुष्यबळ व रुग्णसेवेच्या गुणवत्तेची पाहणी करण्यात आली.

या प्रसंगी उपसंचालक डॉ. शशिकांत शंभारकर, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र (HFWTC), नागपूरचे प्राध्यापक डॉ. श्रीराम गोगुलवार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन कापसे, सिव्हिल सर्जन डॉ. संदीप गजभिये, JAS



समितीच्या अध्यक्षा डॉ. स्वाती वाघाये, केसलवाडा (वाघ) ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. स्वप्नील बोरकर तसेच सर्व सीपीएचसी (CPHC) प्रशिक्षक उपस्थित होते.

भेटीदरम्यान आयुक्त श्री. काटकर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, पीटीएलए सदस्य, आशा स्वयंसेविका तसेच इतर कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व सूचना जाणून घेतल्या. त्यांनी सर्व समस्या संयमाने ऐकून घेत आवश्यक मार्गदर्शन केले. तसेच, विविध अडचणींचे टप्प्याटप्प्याने निराकरण करण्यासाठी सकारात्मक प्रयत्न केले जातील, असे आश्वासनही त्यांनी दिले.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. मिनाक्षी सावरकर, डॉ. स्नेहल दहाटे, प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी, पीटीएलए सदस्य आणि आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या या भेटीमुळे आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून प्राथमिक स्तरावरील आरोग्य सेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण व लोकाभिमुख करण्यासाठी ही भेट प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# रायते गावचे भुमि पुत्र भाविन विठ्ठल गोडांबे यांचा घेतला महपूराने बळी

**दैनिक युवक आधार**

**कल्याण (रशिद शेख)** : कल्याण तालुक्यातील रायते गावामध्ये असणारा युवक भाविन विठ्ठल गोडांबे (यांचे वय अंदाजे २३) आहे तरी हे काही कामानिमित्त बाहेरगावी गेले होते मध्ये एक आठवडा पाऊस लागोपाठ चालू असल्याने सगळीकडे पाणी पाणी होते अन् ते परत घरी येत असताना दहागाव रस्त्या लगट एक छोटासा पुलं आहे आणि तीथे पाणी साचल्याने त्यांना पाण्याचा अंदाज न आल्यामुळे त्यांनी



आपल्या घरी येण्याचा प्रयत्न केला पण देवाने त्यांच्यावर काळाने घाला घातला आणि तीथेच मृत्युमुखी पडले नंतर जसे जसे पाणी कमी होत गेले तसे ती प्रेतं त्या रोडच्या कडेला सिमेंटच्या पाईपाच्या बाजुला आढळून आली आहे येणाऱ्या जाणाऱ्यांना दिसून आली आहे नंतर काही आजुबाजूच्या परिसरातील व रायते गावांतील काही मंडळी तीथे जमले आणि त्या प्रेतला ओळखणे मुसकील होतें कारण ती प्रेतं फार कुजुन गेली होती पण काही नविन तरुणांनी कपड्यांवरुन तर काहींनी न रेनकोट वरुन ओळखले आहे आणि ताबडतोब रायते गावाच्या अंतर्गत असलेल्या गोवेली पोलीस चौकीला कळविण्यात आले आणि गोवेली पीसाळ मेजर व त्यांचे सहकारी कर्मचारी यांनी कुठे वेळ वाया न घालवता ताबडतोब घटनास्थळी येऊन विचार पुस करुन पंचनाम्याला सुरुवात केली आणि ते मृतध्ये आपल्या ताब्यात घेऊन सेंटर हॉस्पिटल दवाखान्यात पोस्ट मॅडम साठी नेण्यात आला आणि परत तेथून ते प्रेत पोलीस मार्फत त्यांच्या नातेवाईक यांना देण्यात आला आणि पुढे अंत्यसंस्कार करण्यात आला यावेळी ग्रामस्थ नातेवाईक सह मित्र परिवार उपस्थित होता... भाविन गोडांबे यांना श्रद्धांजली अर्पण करुन अखेरचा निरोप देण्यात आला.

# राष्ट्रीय स्तरावर विद्या प्रतिष्ठान अनंतराव पवार इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थिनींची चमकदार कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : विद्या प्रतिष्ठान अनंतराव पवार इंग्लिश मिडीयम स्कूलच्या दोन विद्यार्थिनींनी राष्ट्रीय स्तरावर आपल्या साहित्यिक प्रतिभेचा ठसा उमटवत शाळेच्या नावाला नवा मान मिळवून दिला आहे. कु. अनुष्का कन्हेरकर आणि कु. रितिका धुमाळ यांच्या हिंदी कविता भारत सरकारच्या उद्योग संवर्धन व व्यापार विभाग अंतर्गत कार्यालय महानियंत्रक (अभिकल्प व व्यापार चिन्ह) यांच्या वतीने प्रकाशित 'अटल बाल हिंदी कविता संग्रह –२०२५' या प्रतिष्ठित राष्ट्रीय काव्यसंग्रहासाठी निवडल्या गेल्या असून त्यांच्या कवितांना राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. युवा पिढीमध्ये हिंदी भाषा आणि साहित्याच्या माध्यमातून सर्जनशील अभिव्यक्तीला चालना देणे तसेच बौद्धिक संपदा हक्क आणि कॉपीराइट संरक्षणाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या उद्योग संवर्धन व अंतर्गत व्यापार विभाग अंतर्गत कार्यालय महानियंत्रक (अभिकल्प व व्यापार चिन्ह) यांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. देशभरातून तब्बल ६७५ मौलिक हिंदी कविता प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी उत्कृष्ट १०० बालकवींच्या रचनांची निवड करून त्यांचा 'अटल बाल हिंदी कविता संग्रह –२०२५' मध्ये समावेश करण्यात आला. या मानाच्या यादीत विद्या प्रतिष्ठानच्या कु.अनुष्का कनेरकर आणि कु. रितिका धुमाळ यांनी स्थान मिळवत शाळेचा गौरव वाढविला आहे.विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. शाळेच्या हिंदी विभागप्रमुख सौ.मंदा भोसले,सौ. शीतल धुमाळ आणि मुख्याध्यापिका श्रीमती सरिता शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींनी आपल्या सर्जनशील लेखनकौशल्याची उत्कृष्ट छाप पाडली आहे. विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल विद्या प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष ॲड. अशोक प्रभुणे, सचिव नीलिमा गुजर, खजिनदार युगेंद्र पवार यांनी आणि इतर मान्यवर सदस्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, त्यांच्या भावी साहित्यिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.राष्ट्रीय स्तरावर मिळालेली ही गौरवाची संधी विद्यार्थिनींच्या लेखनप्रतिभेची साक्ष देणारी असून, त्यांच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही सर्जनशील लेखनाची प्रेरणा मिळणार आहे. विद्या प्रतिष्ठान अनंतराव पवार इंग्लिश मिडीयम स्कूलसाठी हा अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण ठरला आहे.

# महापुरुषांच्या अवमानावरून सिल्लोडमध्ये संताप; राजु थोटेवर गुन्ह्याची मागणी

## लहुजी क्रांती सेना व आरक्षण उपवर्गीकरण समर्थन कृती समितीचा पवित्रा; पोलीस ठाण्यात दिले निवेदन



**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी :** अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण करण्यात यावे या मागणीसाठी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात मातंग समाजाच्या वतीने मोर्चा, आंदोलन काढण्यात येत आहे. सदरील मोर्चा, आंदोलनात मातंग समाजाचे विविध सामाजिक संघटनेच्या प्रमुखासह राजकीय पक्षातील पदाधिकारी सुद्धा सहभागी झालेले आहेत. मा. सुप्रीम कोर्टाने महाराष्ट्र सरकारला दिलेल्या आदेशानुसार व इतर राज्यात झालेल्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या आधारे अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण करण्याची मागणी मातंग समाज करत आहे.

अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाचा मुद्दा चालू असताना राजु थोटे नामक व्यक्ती सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हिडिओ प्रसारित करून आद्याक्रांतिगुरु लहुजी वस्ताद साळवे तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या महापुरुषांबद्दल अत्यंत गलीच्छ शब्दाचा वापर करून अपमान करत आहेत. तसेच अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण लढ्यात विविध सामाजिक संघटनेचे मातंग समाजाचे नेते, कार्यकर्ते आहेत त्यांना सुद्धा सोशल मीडियाच्या माध्यमातून शिवीगाळ करणे तसेच 'मांगट्या' म्हणून अपमानित करणे तसेच महिलांना सुद्धा अर्वाच्च भाषा वापरली जात आहे.

मातंग समाज व बौद्ध समाजात सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हिडिओ प्रसारित करून तेढ निर्माण करणाऱ्या राजु थोटे नामक व्यक्तीचा व त्याने केलेल्या वक्तव्याचा निषेध करत लहुजी क्रांती सेना तसेच आरक्षण उपवर्गीकरण समर्थन कृती समिती सिल्लोड तालुका यांच्यासह विविध सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने सिल्लोड शहर तसेच सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाणे यांना निवेदन देऊन कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यावेळी निवेदन देताना लहुजी क्रांती सेनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अशोकराव कांबळे, संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष सखाराम अहिरे, संघटनेचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब गायकवाड, सिल्लोड शहराध्यक्ष साहेबराव सोनवणे, शहर समन्वयक विष्णु सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते विष्णु साळवे, किसन सौदागर, विशाल आहीरे, संघटनेचे शहर उपाध्यक्ष मनोज आहीरे, शहर सचिव रवींद्र महाले, तालुका उपाध्यक्ष अमोल खेत्रे, युवा कार्यकर्ते रवि दनके, मनोज दनके, नितीन दनके, कृष्णा सोनवणे, स्वप्नील सोनवणे यांच्यासह आदी समाजबांधव तसेच विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# IIFL कामोठे शाखेकडून 399.27 ग्रॅम सोन्याचा कथित बेकायदेशीर लिलाव

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** कामोठे येथील रहिवासी प्रशांत दत्ताराम भुरुक यांनी IIFL (India Infoline Finance Ltd.) कामोठे शाखेविरोधात दाखल केलेल्या ग्राहक तक्रारीत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई उपनगर (वांद्रे) यांनी 25 जून 2026 रोजी एकतर्फी (Ex Parte) निर्णय दिला आहे.

प्रशांत भुरुक यांनी सांगितले की, त्यांनी मे 2022 मध्ये ॲड. मंगेश आरोते यांच्या मार्फत ग्राहक आयोगात तक्रार दाखल केली होती. या प्रकरणाचा अंतिम युक्तिवाद त्यांनी स्वतः आयोगासमोर केला. या प्रकरणाचा निर्णय अध्यक्षा सौ. समिंदरा आर. सुर्वे आणि सदस्य श्री. समीर एस. कांबळे यांनी दिला.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, त्यांनी मे 2020 मध्ये 399.27 ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांवर कर्ज घेतले होते. त्यानंतर फेब्रुवारी 2021 मध्ये ते कोविड-19 पॉझिटिव्ह आले व होम क्वारंटाईनमध्ये होते. या काळात कोणतीही पूर्वकल्पना, प्रभावी नोटीस किंवा कायदेशीर प्रक्रिया न पाळता बँकेने दागिने विकल्याचे नंतर सांगितले, असा त्यांचा आरोप आहे.तक्रारदाराच्या मते, क्वारंटाईन संपल्यानंतर त्यांनी बँकेत जाऊन थकीत रक्कम भरण्याची तयारी दर्शविली होती. मात्र त्यांना दागिने आधीच विकल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर त्यांनी ग्राहक आयोगात दाद मागितली.

या प्रकरणात आयोगाने नमूद केले की, बँकेचे प्रतिनिधी सुनावणीदरम्यान हजर राहिले नाहीत आणि त्यांनी लेखी उत्तरही दाखल केले नाही. त्यामुळे प्रकरण एकतर्फी (Ex Parte) चालविण्यात आले.

निर्णयात आयोगाने IIFL ला "Deficiency in Service" (सेवेतील त्रुटी) आणि "Unfair Trade Practice" (अन्यायकारक व्यापार पद्धती) बाबत दोषी धरले आहे. तसेच, तक्रारदाराने न्यायालयाच्या आदेशानुसार संपूर्ण थकीत कर्ज, व्याज आणि इतर देय रक्कम भरल्यास 60 दिवसांच्या आत रक्कम भरून त्यानंतर 15 दिवसांच्या आत दागिने परत करण्याचे निर्देश दिले आहेत.

तथापि, तक्रारदाराचे म्हणणे आहे की आयोगाने काही महत्त्वाच्या बाबींचा पुरेसा विचार केला नसावा. विशेषतः,

"विशेष बाब म्हणजे, ग्राहक आयोगाने IIFL ला 'Deficiency in Service' (सेवेतील त्रुटी) आणि 'Unfair Trade Practice' (अन्यायकारक व्यापार पद्धती) बाबत दोषी ठरविले असले, तरी संबंधित बँक अधिकाऱ्यांविरुद्ध कोणतीही स्वतंत्र कारवाई करण्याचे निर्देश दिले नाहीत. तसेच, कोविड काळात झालेला मानसिक त्रास, आर्थिक नुकसान आणि दीर्घकाळ न्यायालयीन लढा देऊनही तक्रारदाराला मानसिक छळ किंवा नुकसानभरपाई (Compensation) मंजूर करण्यात आलेली नाही. त्यामुळे तक्रारदाराने या निर्णयातील या भागाबाबत नाराजी व्यक्त केली असून, पुढील कायदेशीर पर्यायांचा विचार करत असल्याचे सांगितले आहे."त्या संदर्भातील परिस्थितीवर अधिक स्पष्ट निर्णय अपेक्षित होता, असे त्यांनी म्हटले आहे.

प्रशांत भुरुक यांनी सांगितले की, ते न्यायालयाच्या आदेशाचे पालन करून संपूर्ण थकीत रक्कम भरण्यास तयार आहेत आणि त्याबदल्यात 399.27 ग्रॅम सोन्याचे सर्व दागिने परत मिळावेत, अशी त्यांची अपेक्षा आहे. त्यांनी IIFL ला आदेशाची अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले आहे.

याशिवाय, ही न्यायालयीन लढाई सुरू झाल्यापासून स्वतःच्या सुरक्षिततेबाबत चिंता वाटत असल्याने त्यांनी पोलिसांकडेही लेखी तक्रार दिल्याचे त्यांनी सांगितले. या संदर्भात त्यांनी संबंधित यंत्रणांनी आवश्यक ती दखल घ्यावी, अशी मागणी केली आहे.

प्रकरणाचा पुढील टप्पा म्हणून तक्रारदार न्यायालयाच्या आदेशानुसार बँकेकडे थकीत रक्कम जमा करण्याची प्रक्रिया सुरू करणार असून, आदेशाची पूर्ण अंमलबजावणी होऊन दागिने परत मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# तहसीलदार अंकिता टाकभाते यांचे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन

■ 'लॉजिक कॉम्प्युटर्स'तर्फे दिव्यांग विद्यार्थ्यांचा गौरव;

■ 'AI' साक्षरता उपक्रमाची घोषणा




**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : "आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक पदवी पुरेशी नसून संगणक साक्षरता, कौशल्य विकास, शिस्त, प्रामाणिकपणा आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या बळावरच यश संपादन करता येते. विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करून स्वतःला सक्षम बनवावे," असे प्रतिपादन सिल्लोडच्या तहसीलदार अंकिता टाकभाते यांनी केले.

सिल्लोड येथील लॉजिक कॉम्प्युटर्स येथे आयोजित एमएस-सीआयटी (MS-CIT) विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या कार्यक्रमास मंडळ अधिकारी विश्वनाथ ताठे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तहसीलदार अंकिता टाकभाते यांनी आपल्या मार्गदर्शनात संगणक शिक्षणाचे वाढते महत्त्व, स्पर्धा परीक्षांची तयारी, शासकीय सेवांमधील संधी, वेळेचे नियोजन, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन यावर सविस्तर प्रकाश टाकला. एमएस-सीआयटीसारख्या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थी डिजिटलदृष्ट्या सक्षम होऊन रोजगाराच्या नव्या संधींचा लाभ घेऊ शकतात, असे त्यांनी सांगितले.

यावेळी एमएस-सीआयटी अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांचा ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या जिद्दीचे, चिकाटीचे आणि यशस्वी वाटचालीचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व नागरिक उपस्थित होते. संस्थेचे कर्मचारी जावेद पठाण, आकाश अरके, जयदीप जैवल व राहुल दांडगे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**'AI महाराष्ट्र साक्षर करू या' - नवीन उपक्रमाची घोषणा**

**कार्यक्रमात लॉजिक कॉम्प्युटर्सचे संचालक जितेंद्र पाडवे यांनी 'AI महाराष्ट्र साक्षर करू या' या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची घोषणा केली. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) हे भविष्यातील तंत्रज्ञान असून, ग्रामीण भागातील विद्यार्थी व नागरिकांना या तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी विशेष प्रशिक्षण व जनजागृती मोहीम राबवण्यात येणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.**

# मुरुडमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर; जलशुद्धीकरण केंद्रातील फिल्टर तातडीने सुरू करण्याची भीम क्रांती संघाची मागणी

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी** : मुरुड येथील जलशुद्धीकरण केंद्रातील फिल्टर यंत्रणा दीर्घकाळापासून बंद असल्याने नागरिकांना शुद्धीकरण न केलेल्या पाण्याचा पुरवठा होत असल्याचा आरोप करत भीम क्रांती संघाने ग्रामपंचायत प्रशासनाकडे निवेदन सादर केले आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित हा गंभीर प्रश्न तातडीने सोडवून शुद्ध पिण्याच्या पाण्याचा नियमित पुरवठा सुरू करावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.



निवेदनानुसार, मुरुड येथील जलशुद्धीकरण केंद्रातील फिल्टर प्रणाली अनेक दिवसांपासून बंद असून, कोणतीही शुद्धीकरण प्रक्रिया न करता थेट पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. दूषित पाण्यामुळे पोटाचे विकार, कावीळ, टायफॉईड तसेच इतर जलजन्य आजारांचा धोका वाढू शकतो, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संघटनेने यापूर्वीही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठपुरावा केला होता. त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी जलशुद्धीकरण केंद्राचे काम पूर्ण होऊन ते २० नोव्हेंबर २०२३ रोजी ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्यात आल्याचे सांगितले होते.

त्यामुळे केंद्राची देखभाल, दुरुस्ती आणि फिल्टर प्रणाली कार्यान्वित ठेवण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची असल्याचा मुद्दा निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे

याशिवाय जलशुद्धीकरण केंद्र परिसराची नियमित स्वच्छता, आवश्यक दुरुस्ती, तसेच फिल्टर प्रणाली तातडीने सुरू करून नागरिकांना सुरक्षित व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड न करता प्रशासनाने या प्रकरणी तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे.

या निवेदनाची प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर तसेच गटविकास अधिकारी, पंचायत समिती लातूर यांनाही पाठविण्यात आली आहे.

हे निवेदन भीम क्रांती संघाचे संस्थापक अध्यक्ष जयदीप राजाराम सुरवसे, मुरुड शहर उपाध्यक्ष काकासाहेब मस्के आणि जिल्हा महासचिव शाईन सय्यद यांच्या स्वाक्षरीने ग्रामपंचायत प्रशासनाकडे सादर करण्यात आले आहे.

# पाथरी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे** : पाथरी/ गेल्या आठ दिवसांपासून पावसाने उघडीप दिली असून तापमानात वाढ झाली आहे त्यामुळे पाथरी तालुक्यातील शेतकऱ्यांची उगवलेली पिके संकटात सापडले आहेत काही शेतकऱ्यांनी पिके जगवण्यासाठी धडपड सुरू आहे ज्यांच्याकडे पाणी उपलब्ध आहे



त्या शेतकऱ्यांनी तुषार सिंचनाचा वापर सुरू केला आहे ज्यांच्याकडे पाणी उपलब्ध नाही त्या शेतकऱ्यांनी पावसासाठी आता धावा सुरू केल्या आता रोपे करपण्याची शक्यता आहे कडक उन्हामुळे शेतातील माती कोरडी पडत असून उगवलेली रोपे करपण्याची शक्यता आहे पशुधनाच्या चारा पाण्याचा प्रश्न ऐरणीवर कडब्याचा साठा आला संपत उन्हाळ्यातील शिल्लक असलेला कडबा आणि चारा आता संपल्यात जमा आहे नवीन गवत किंवा चारा उगवण्यासाठी पाऊसच नसल्याने चारा टंचाई भासत आहे तसेच भीषण पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होत आहे

विहीर बोअरवेल बंधारे यांनी सुध्दा तळ गाठला आहे पाथरी तालुक्यातील मुदगल येथे आज दि १२ जुलै रोजी पाऊस पडावा म्हणून मारोतीस गोदावरी नदीचे पाणी नेऊन मारोती देवाची पूजा करून नैवेद्य दाखवून दिला आहे

# पावसाचा दुहेरी फटका; श्रीवर्धनातील भातशेती संकटात, शेतकरी प्रशासनाच्या मदतीच्या प्रतीक्षेत

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित** : श्रीवर्धन तालुक्यात यंदाच्या पावसाळ्याने शेतकऱ्यांची मोठी निराशा केली आहे. सुरुवातीला झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शेतांमध्ये पाणी साचल्याने भाताची रोपे कुजली, तर काही भागात माती वाहून गेल्याने पिकांचे गंभीर नुकसान झाले. त्यानंतर अचानक पावसाने दडी मारल्यामुळे उरलेली पिकेही धोक्यात आली असून शेतकरी पुन्हा एकदा चिंतेच्या गर्तेत सापडला आहे.

विशेष म्हणजे, हवामान खात्याने काही महिन्यांपूर्वीच यंदाचा पाऊस कमी आणि सातत्यपूर्ण नसण्याचा अंदाज व्यक्त केला होता. अशा परिस्थितीत कृषी विभाग आणि संबंधित प्रशासनाने शेतकऱ्यांसाठी पर्यायी नियोजन, मार्गदर्शन, बियाणे उपलब्धता, जलव्यवस्थापन किंवा अन्य प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविल्या गेल्याचे चित्र दिसून आले नाही, अशी नाराजी शेतकरी व्यक्त करत आहेत.

मुसळधार पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे प्रशासनाकडून करण्यात आले असले, तरी अद्याप नुकसानभरपाई, पुनर्लागवडीसाठी मदत किंवा अन्य ठोस निर्णय जाहीर झालेला नाही. त्यामुळे पंचनामे करूनही प्रत्यक्ष दिलासा मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये



असंतोष वाढत आहे.

एकीकडे निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती धोक्यात आली आहे, तर दुसरीकडे प्रशासनाकडून वेळेवर ठोस उपाययोजना न झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक संकट अधिकच गडद होत आहे. उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान भरून काढणे शेतकऱ्यांसाठी अशक्य बनले आहे.

या परिस्थितीमुळे श्रीवर्धन तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी शेतीकडे पाठ फिरवण्यास सुरुवात केली असून काहींनी शेती करणेच बंद केले आहे. ही परिस्थिती भविष्यात अन्न उत्पादनावरही परिणाम करू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने नुकसानभरपाई जाहीर करणे, पुनर्लागवडीसाठी आर्थिक मदत देणे, कृषी विभागामार्फत विशेष मार्गदर्शन शिबिरे आयोजित करणे तसेच भविष्यात अशा परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी दीर्घकालीन नियोजन करण्याची मागणी केली आहे. अन्यथा श्रीवर्धन तालुक्यातील भातशेतीचे अस्तित्वच धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# करंजाडेतील तरुणाची गळा दाबून हत्या ; शवविच्छेदनातील विलंबावरून उपजिल्हा रुग्णालयाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : करंजाडे येथील २८ वर्षीय तरुण शुभम मारुती पवार याच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाला आता धक्कादायक वळण मिळाले असून, शवविच्छेदन अहवालात गळा दाबून हत्या झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पनवेल शहर पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तींविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास वेगाने सुरू असताना काही संशयितांची चौकशी सुरू असल्याची माहिती समोर येत आहे.

या संपूर्ण प्रकरणात शवविच्छेदन प्रक्रियेत झालेल्या कथित विलंबामुळे पनवेल उपजिल्हा रुग्णालयाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.एकीकडे आरोग्य व्यवस्था सक्षम व्हावी यासाठी सरकार मधील आमदार प्रयत्न करत असून दुर्दैवी अश्या घटनेतील कुटुंब सदस्य रुग्णालयाच्या वाईट अनुभवाने सामोरे गेलेले पाहायला मिळत आहे.स्थानिक नागरिकांमध्ये संताप आणि संभ्रमाचे वातावरण असून, वैद्यकीय यंत्रणेतील पारदर्शकता व उत्तरदायित्वाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुभम पवार (रा. स्कायलाइन सोसायटी, सेक्टर-३, करंजाडे) हा इलेक्ट्रिशियन म्हणून काम करत होता. ७ जुलै रोजी कामावरून घरी आल्यानंतर मित्राचा फोन आल्याने तो घराबाहेर गेला. त्यानंतर त्याचा मोबाईल बंद लागत असल्याने कुटुंबीयांनी पनवेल शहर पोलिस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली.

पोलिसांकडून शोधमोहीम सुरू असताना ८ जुलै रोजी वरचे ओवळे येथील सेक्टर-१ परिसरात रिक्षा स्टँडसमोर त्याची दुचाकी व इलेक्ट्रिशियनचे साहित्य अस्ताव्यस्त अवस्थेत आढळून आले. त्याच दिवशी महात्मा फुले पाण्याच्या टाकीजवळील डबक्यात त्याचा मृतदेह सापडला. सुरुवातीला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती; मात्र पुढील शवविच्छेदन अहवालात मृत्यूचे कारण गळा दाबून हत्या असल्याचे स्पष्ट झाल्याने पोलिसांनी गुन्ह्याचे स्वरूप बदलत हत्येचा गुन्हा दाखल केला.

या प्रकरणात शवविच्छेदनासाठी पनवेल उपजिल्हा रुग्णालयात कथित विलंब होत असल्याची चर्चा समोर आल्यानंतर मृतदेह मुंबईतील जे. जे. रुग्णालयात पाठविण्यात आला. त्यानंतर आलेल्या अहवालामुळे प्रकरणाला निर्णायक कलाटणी मिळाली. या पार्श्वभूमीवर उपजिल्हा




## रिपाई नेते प्रभाकर कांबळे यांची निष्पक्ष चौकशीची मागणी; अज्ञातांविरोधात हत्येचा गुन्हा दाखल

> जिल्हा उपरुग्णालयाने वैद्यकीय कार्यात अश्या वेळी 1 तासापेक्षा जास्त विलंब होत असल्यास लेखी पत्राद्वारे उपस्थित दुर्घटनाग्रस्तांना पत्र द्यावे व सहकार्य करावे
>
> साबीर शेख

रुग्णालयाच्या कार्यपद्धतीबाबत विविध स्तरांतून प्रश्न उपस्थित होत आहेत.

रिपब्लिकन पक्षाचे (आठवले गट) नेते प्रभाकर कांबळे यांनी या संपूर्ण घटनेची निष्पक्ष, पारदर्शक आणि सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. गुन्ह्याचा तपास जलदगतीने पूर्ण करून आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, तसेच अशा गंभीर प्रकरणांमध्ये वैद्यकीय अहवाल व तपास प्रक्रियेसाठी स्वतंत्र जबाबदार वैद्यकीय आणि पोलीस अधिकारी कक्ष स्थापन करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

या प्रकरणाचा पाठपुरावा केंद्रीय मंत्री रामदास आठवले स्वतः करत असल्याचेही कांबळे यांनी सांगितले. कोणत्याही सामान्य नागरिकाला न्याय मिळण्यात विलंब होऊ नये, शासनाने जबाबदारीने आपले कर्तव्य पार पाडावे आणि गुन्हेगारी प्रवृत्तीवर प्रभावी नियंत्रण ठेवावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, शुभम पवार यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन प्रभाकर कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सांत्वन केले. या वेळी मृताच्या नातेवाईकांनी भावनिक वातावरणात त्यांचे आभार मानले.

या संपूर्ण घटनेमुळे वैद्यकीय यंत्रणा, तपास प्रक्रिया आणि नागरिकांचा विश्वास या तिन्ही बाबी पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आल्या आहेत. सत्य परिस्थिती लवकरात लवकर जनतेसमोर यावी आणि दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी आता अधिक तीव्र होत आहे.

# पनवेल परिसरातील पदभार स्वीकारलेल्या अधिकाऱ्यांचा 'दैनिक युवक आधार'तर्फे सत्कार व अभिनंदन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल : प्रतिनिधी** : पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी नुकतेच श्री. बाळा कुंभार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अनेक धाडसी निर्णय घेत प्रभावी कारवाई सुरू केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत दैनिक युवक आधारच्या संपादकीय टीमतर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले.







तसेच, धाडसी आणि कर्तव्यदक्ष महिला पोलीस अधिकारी म्हणून ओळख असलेल्या श्रीमती ज्योती देशमुख यांनी कामोठे शहर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदाचा पदभार स्वीकारला. त्यांच्या पुढील यशस्वी कारकिर्दीसाठी दैनिक युवक आधारतर्फे शुभेच्छा देण्यात आल्या.

याचप्रमाणे, पनवेल महारपालिकाच्या मुख्य



अभियंतापदी श्री. राजेश कर्डीले यांनी पदभार स्वीकारला. शांत, संयमी आणि अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असलेल्या श्री. कर्डीले यांचेही दैनिक युवक आधारच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

यावेळी दैनिक युवक आधारचे संपादक डॉ. संतोष शिवदास आमले, महाराष्ट्र संपादक अजय पांडुरंग कापरे, सहसंपादक मुकुंद कांबळे, कोकण विभाग संपादक विजय दुंद्रेकर, पनवेल तालुका प्रतिनिधी मच्छिंद्र पाटील तसेच पनवेल महानगर प्रतिनिधी जगदीश क्षीरसागर उपस्थित होते.

# साईबाबा मंदिर, कामोठे । मोफत दंत तपासणी, छत्री व शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : समाजाच्या गरजा ओळखून योग्य वेळी मदतीचा हात पुढे करणे, हीच लोकसेवेची खरी ओळख आहे.माझ्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त साईबाबा मंदिर, कामोठे येथे मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन तसेच शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप, नागरिकांना छत्री वाटप करण्यात आले.सदर शिबिरामधे नागरिकांनी दंत तपासणीचा लाभ घेतला, शालेय विद्यार्थ्यांना वह्यांचे वितरण करण्यात आले, तर पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना छत्र्यांचेही वाटप करण्यात आले. समाजातील विविध घटकांच्या गरजा लक्षात घेऊन राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.लोकप्रतिनिधी म्हणून विकासकामांसोबतच आरोग्य, शिक्षण आणि दैनंदिन जीवनाशी निगडित गरजांनाही तितकेच महत्त्व देणे आवश्यक आहे. अशा छोट्या उपक्रमांमधून अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे.यावेळी माजी नगरसेवक सखारामजी पाटील, संजयजी साळुंके, आमदार विक्रांत दादा पाटील युवाशक्ती





संघाचे अध्यक्ष आकाशजी पाटील,अशोकजी भोईर,संदीपजी मोहिते, भूषणजी पाटेकर, नितेशजी म्हात्रे, आदेशजी पाटील, समीरजी मुंडे उपस्थित होते. या समाजोपयोगी उपक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल तुषार साळुंखे व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार. तसेच या उपक्रमाला उपस्थित राहून सहकार्य करणाऱ्या सर्व डॉक्टरांचे, स्वयंसेवकांचे आणि नागरिकांचेही मनःपूर्वक आभार.

# मिशन निपुण बीड संकल्प कार्यशाळेत राष्ट्रपती पुरस्कार विजेते आदर्श शिक्षक दत्तात्रय वारे यांना 'फुलांची शाळा' बालकाव्यसंग्रह भेट

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** - आष्टी येथे शनिवार दिनांक ११ जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या मिशन निपुण बीड संकल्प कार्यशाळेत एक प्रेरणादायी आणि साहित्यिक स्वरूपाचा सुंदर क्षण अनुभवायला मिळाला. राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त जालिंदर नगर येथील आदर्श शिक्षक श्री.दत्तात्रय वारे यांना कवयित्री तथा आदर्श शिक्षिका श्रीमती शेख नजमा मॅडम यांनी त्यांच्या स्वरचित 'फुलांची शाळा' या बालकाव्यसंग्रहाची भेट देऊन सन्मानित केले. या वेळी श्रीमती शेख नजमा मॅडम यांनी बालसाहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती, सर्जनशीलता, नैतिक मूल्ये आणि भाषिक कौशल्यांचा विकास व्हावा, या उद्देशाने 'फुलांची शाळा' हा बालकाव्यसंग्रह तयार केल्याचे सांगितले. त्यांच्या या



साहित्यकृतीचे श्री.दत्तात्रय वारे यांनी कौतुक करत बालकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी अशा साहित्ययाची नितांत आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. मिशन निपुण बीड संकल्प कार्यशाळेत उपस्थित शिक्षकांनीही या साहित्यिक देवाणघेवाणीचे स्वागत केले. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दोन आदर्श शिक्षकांच्या या प्रेरणादायी भेटीमुळे कार्यशाळेचे वातावरण अधिक समृद्ध झाले होते. या प्रसंगी उपस्थित शिक्षकांनी श्रीमती शेख नजमा मॅडम यांच्या साहित्यनिर्मितीचे तसेच राष्ट्रपती पुरस्कार विजेते आदर्श शिक्षक श्री.दत्तात्रय वारे यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करत त्यांना शुभेच्छा दिल्या. शिक्षण, साहित्य आणि संस्कार यांचा सुंदर संगम घडविणारा हा प्रसंग उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

# पनवेल शहर वाहतूक शाखेच्या तत्परतेमुळे अपघातग्रस्त तिघांना तात्काळ उपचार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : दिनांक १२ जुलै २०२६ रोजी सकाळी सुमारे ११.०० वाजण्याच्या दरम्यान शिवशंभू नाका ते पळस्पे मार्गावरील मुख्य रस्त्यावर, गाढी नदीपुढे कोस्ट गार्ड बिल्डिंगसमोरील नांदगाव कट येथे दोन दुचाकींचा अपघात झाला. याबाबतची माहिती शिवशंभू सिग्नल येथे वाहतूक नियमन करत असलेले बीट मार्शलवरील पोलीस हवालदार अमीर मुलाणी व पोलीस शिपाई सुरेश जौंजाळ यांना मिळताच त्यांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेतली.

अपघातात रस्त्यावर जखमी अवस्थेत पडलेल्या दोन महिला व एका पुरुषाला पोलीस हवालदार अमीर मुलाणी, पोलीस शिपाई सुरेश जौंजाळ व उपस्थित नागरिकांच्या मदतीने कोणताही विलंब न करता, ॲम्ब्युलन्सची वाट न पाहता रस्त्याने जाणाऱ्या दोन खासगी ऑटो रिक्षांद्वारे उपचारासाठी तात्काळ पनवेल ग्रामीण रुग्णालयात रवाना करण्यात आले.

त्यानंतर अपघातग्रस्त दोन्ही दुचाकी रस्त्याच्या बाजूला काढून बीट मार्शल अंमलदार व नागरिकांच्या सहकार्याने वाहतूक सुरळीत करण्यात आली.

त्यामुळे काही वेळातच वाहतूक पूर्ववत सुरू झाली.

या घटनेची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) भागवत मॅडम यांना देण्यात आली. त्यांच्या सूचनेनुसार पोलीस कर्मचाऱ्यांनी पनवेल ग्रामीण रुग्णालयात जाऊन जखमींची भेट घेतली.

तिघांचीही प्रकृती स्थिर असून धोक्याबाहेर असल्याचे समजले. यावेळी रुग्णालयात उपस्थित नातेवाईकांनी पोलीस व नागरिकांनी केलेल्या तात्काळ मदतीबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी दाखविलेली तत्परता, कर्तव्यदक्षता व मानवतावादी भूमिका यामुळे अपघातग्रस्तांना वेळेत उपचार मिळाले.

त्यांच्या या कार्याचे नागरिकांकडून सर्वत्र कौतुक होत आहे.













# यवतमाळ ते अदिलाबाद रेल्वे धावणार! खासदार नागेश घोडाम यांचा मोठा शब्द

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर** : "कोणत्याही परिस्थितीत आपल्या भागातून रेल्वे मार्ग नेणारच, यासाठी मी दिल्लीत पूर्ण ताकद लावेन!" असा ठाम आणि आश्वासक निर्धार अदिलाबादचे खासदार श्री. नागेश घोडाम यांनी व्यक्त केला आहे. नुकत्याच झालेल्या एका महत्त्वपूर्ण बैठकीत त्यांनी यवतमाळ, घाटंजी, पारवा, उनकेश्वर आणि मांडवी ते अदिलाबाद या संपूर्ण पट्ट्याला रेल्वेने




जोडण्याचे आश्वासन दिले असून, यामुळे आपल्या भागाचा कायापालट होऊन विकासाची नवी पहाट उजाडेल असा विश्वास त्यांनी दर्शवला.या ऐतिहासिक घडामोडीचे साक्षीदार ठरत टिपेश्वर रेल्वे जन आंदोलन समितीचे अध्यक्ष महेश पेंदोर, सल्लागार समिती अध्यक्ष कैलास कोरवते, प्रेम वेट्टी, गजानन चिल्लावार यांच्यासह मांडवी सर्कल मधील मान्यवर धनलाल पवार, सुनील श्रीमनवार, दिलीप राठोड आणि सुरेश राठोड यांनी या चर्चेत हिररीने भाग घेतला होता. खासदारांच्या या 'ॲक्शन मोड'मुळे आता जनतेचे रेल्वेचे स्वप्न सत्यात उतरणार असून, संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण पसरले आहे.



# भिवापूर तालुक्यातील पुल्लर ते डोंगरमौदा रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था

## रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी नागपूर** -भिवापूर तालुक्यातील १२ किलोमीटर अंतरावर असलेले गाव म्हणजे पुल्लर होय. पुल्लर पासून डोंगरमौदा ५ किलोमीटर अंतरावर आहे. परंतु रस्ता अत्यंत जीवघेण्या दुर्लभ, हृदयद्रावक विचित्र आहे. अशातच टू व्हीलर प्रवासी तसेच फोर व्हीलर प्रवासी यांना प्रवास वा यातायात करण्यास हानिकारक आहे. कुणाच्या जीवाची कुणाला नाही रे दया मतलबाची आहे आता सारी दुनिया! अपघात कुणी नेले काय आणि कुणी पेटलं काय याची कुणाला काही परवा नाही ?अशात एखाद्या गाडीचा टायर फुटला किंवा पेटल्यास कुणाला काही देणंघेणं नाही. या रस्त्याने जनावरांचा उपद्रव भरपूर असतो मग यातायात प्रवास करणाऱ्या नागरिकांनी आपला प्रवास कसा करावा ? जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधी यांनी या रस्त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन घेऊन दुरुस्तीकरणास सहयोग देऊन हा खराब रस्ता लवकरात लवकर कॉंक्रीटिंग कसा लवकर तयार



होईल अशी मागणी ओबीसी सेवा संघ नागपूर जिल्हा अध्यक्ष नारायण उदापुरे व परिसरातील जनतेने केलेली आहे.

# फुटाळा चौपाटी येथे क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांचा १५१ फूट उंचीचा भव्य पुतळा उभारण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** नागपूर येथील फुटाळा चौपाटी परिसरात आदिवासींचे महान स्वातंत्र्यसैनिक आणि क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांचा १५१ फूट उंचीचा भव्य पुतळा उभारण्यात यावा, अश्या मागणीचे निवेदन भारतीय जनता पार्टी अनुसूचित जमाती (एसटी) मोर्चा, नागपूर महानगरचे शहराध्यक्ष आकाश मडावी यांनी राज्यसभा सदस्य मायाताई इवनाते यांची भेट घेऊन सादर केले.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भगवान बिरसा मुंडा यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढा देत जल, जंगल आणि जमीन यांच्या संरक्षणासाठी ऐतिहासिक संघर्ष केला. त्यांच्या अद्वितीय शौर्य, त्याग आणि राष्ट्रसेवेचा गौरव म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ नोव्हेंबर हा दिवस 'जनजातीय गौरव दिवस' म्हणून घोषित



केला आहे. त्यामुळे त्यांच्या स्मरणार्थ भव्य स्मारक उभारणे हे राष्ट्रीय अभिमानाचे प्रतीक ठरेल.नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी तसेच देशाच्या मध्यवर्ती भागातील महत्त्वाचे शहर असून, फुटाळा चौपाटी हा परिसर पर्यटन व सांस्कृतिक उपक्रमांचे प्रमुख आकर्षण आहे. या ठिकाणी भगवान बिरसा मुंडा यांचा १५१ फूट उंचीचा भव्य पुतळा उभारण्यात आल्यास तो आदिवासी समाजाच्या इतिहासाचा गौरव करणारा तसेच संपूर्ण देशासाठी प्रेरणास्थान ठरेल, असे निवेदनात म्हटले आहे.या स्मारकामुळे भगवान बिरसा मुंडा यांच्या कार्याचा गौरव होईल, युवा पिढीला राष्ट्रभक्ती व सामाजिक समर्पणाची प्रेरणा मिळेल, नागपूरच्या पर्यटन विकासाला चालना मिळेल तसेच आदिवासी समाजाच्या अस्मिता, संस्कृती आणि इतिहासाला योग्य सन्मान प्राप्त होईल. यासोबतच महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे ऐतिहासिक व सांस्कृतिक स्मारक म्हणून नागपूरची नवी ओळख निर्माण होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. राज्यसभा सदस्य मायाताई इवनाते यांनी संबंधित केंद्रीय मंत्रालय, महाराष्ट्र शासन आणि नागपूर महानगरपालिका यांच्याशी समन्वय साधून फुटाळा चौपाटी येथे भगवान बिरसा मुंडा यांचा १५१ फूट उंचीचा भव्य पुतळा उभारण्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी शिष्टमंडळाने केली.

यावेळी शिष्टमंडळात शहराध्यक्ष आकाश मडावी, महामंत्री रोहित कुमरे, अनिकेत कुमरे, मौसमी परतेकी, उपाध्यक्ष अश्विन गेडाम, सागर इवनाते, करुणा आत्राम तसेच मनीष सयाम उपस्थित होते.

# मंदिर ते ज्ञान मंदिर' हरितवारी: बहुली, अन्वीसह ३० ठिकाणी नांद्रुकचे शास्त्रोक्त काष्ठरोपण

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सध्या आषाढवारीने महाराष्ट्र दुमदुमत आहे. वारकरी संप्रदायात वंदनीय असलेल्या व आद्य वृक्षसंवर्धक असलेल्या संत तुकाराम महाराज यांचे वैकुंठगमन ज्या देहू येथील नांदरकी/नांद्रुक वृक्षावरून झाले, तो वृक्ष आजही ५०० हून अधिक वर्षांपासून देहू येथे निसर्गाची सेवा व भाविकांना दर्शन देत आहे. देहू व आळंदी येथील इंद्रायणी परिसरात इतरही नांद्रुक वृक्ष आहेत. त्या इतर वृक्षांपासून काष्ठरोपण अनेक देवस्थानात केले आहे. सिल्लोड तालुक्यातील आमसरी, आसडी, रहीमाबाद,



> 'निसर्गाचा एअर कंडिशनर'
>
> 'हा वृक्ष वडाच्या कुळातील असून तो सर्वाधिक ऑक्सिजन उत्सर्जन करणारा, वातावरणातील उष्मा व कार्बन डायऑक्साइडसारखा हरितगृह वायू सर्वाधिक शोषणारा 'देववृक्ष' आहे. तुकाराम बीजेच्या दिवशी १२ वाजून २ मिनिटांनी देहू येथील या वृक्षाची पाने स्थळ-काळ ऊर्जेने सळसळतात, हा वैकुंठगमन सोहळा अनुभवणे म्हणजे 'याची देही, याची डोळा' अनुभूती असते. ८०० वर्षांच्या वारी परंपरेला जपण्यासाठी राज्यात 'हरितवारी'तून ८०० नांदरकी लावण्याचे कार्य ५ वर्षांपासून सुरू आहे, जे पुढील २ वर्षांत पूर्ण होईल.'
>
> — डॉ. संतोष पाटील,अभिनव प्रतिष्ठान, सिल्लोड.

तसेच भोकरदन तालुक्यातील मलकापूर येथेही बऱ्याच शेतकऱ्यांनी नांद्रुकचे काष्ठरोपण करून ही झाडे वाढवली आहेत.

याच उपरोक्त ४ गावांतून काष्ठरोप संकलन करून सिल्लोड येथील 'वृक्ष व वन्यजीव संवर्धक अभिनव प्रतिष्ठान'चे उपाध्यक्ष व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा सह-कार्यवाह डॉ. संतोष पाटील हे जिल्ह्यासह राज्यात विविध धार्मिक व शैक्षणिक ठिकाणी या एक महिन्यात रोपण करत आहेत. आजवर त्यांनी असे १५० हून अधिक नांदरकीचे शास्त्रोक्त रोपण करून ते वृध्दिंगत केले आहे. याच मोहिमेअंतर्गत बहुली येथील मंदिर आणि अन्वी येथील 'सर्वज्ञ बालक मंदिर शाळा' (आळंद, देऊळगाव) यांसह एकूण ३० ठिकाणी नांद्रुकचे शास्त्रोक्त काष्ठरोपण करण्यात आले आहे.

# आमदार विक्रांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त संत साईबाबा शाळेत शालेय साहित्याचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल : प्रतिनिधी** : आमदार विक्रांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त नवीन पनवेल येथील संत साईबाबा शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम उत्साहात पार पडला. शिक्षणासाठी आवश्यक साहित्य प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचावे आणि कोणताही विद्यार्थी केवळ साधनांच्या अभावामुळे शिक्षणापासून वंचित राहू नये, या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांच्या डोळ्यांतील उत्साह, आत्मविश्वास आणि काहीतरी मोठे करण्याची जिद्द पाहून उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. योग्य





वेळी मिळणारे प्रोत्साहन आणि आवश्यक शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी ठरत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

या कार्यक्रमास आमदार विक्रांत दादा पाटील युवाशक्ती संघाचे अध्यक्ष आकाशजी पाटील, अशोकजी भोईर, भूषणजी पाटेकर, नितेशजी म्हात्रे, आदेशजी पाटील, समीरजी मुंडे, तसेच संत साईबाबा शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. मोरे मॅडम, श्री. गावंड सर, श्री. खैरनार सर, श्री. गायकवाड सर आणि श्री. मंडले सर उपस्थित होते.

सदर उपक्रमाचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल युवा महाराष्ट्र प्रतिष्ठानचे शशिकांतजी देशमुख, अभिषेकजी देशमुख, ॲड. किशोरजी धाकड, परेशजी पाटील, रणजितजी देशमुख तसेच सर्व सहकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी मनःपूर्वक कौतुक करून आभार व्यक्त केले.

# धावडा येथे 'एस.आय.आर.' जनजागृती रॅली; मतदारांना केले प्रोत्साहित

**दैनिक युवक आधार**

**सिल्लोड : तालुक्यातील धावडा** येथील जिल्हा परिषद शाळेच्या वतीने मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी विशेष 'एस.आय.आर.' (SIR) रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीच्या माध्यमातून लोकशाही बळकट करण्यासाठी आणि मतदारांना आपल्या हक्काबाबत जागरूक करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.

गावातून काढण्यात आलेल्या या रॅलीत जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी, शिक्षक, बीएलओ व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी हातात जनजागृतीपर पोस्टर घेऊन आणि घोषणा देत संपूर्ण गावात जनजागृती केली.

या वेळी बीएलओ कविता शिंदे आणि



वाहक संदीप इंगळे यांनी उपस्थितांना मतदार नोंदणी व 'एस.आय.आर.' मोहिमेबाबत सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन केले.

या उपक्रमाप्रसंगी मुख्याध्यापक सुमेध गजभिये, सहशिक्षक लक्ष्मण तावरे, ओमप्रकाश संत्रे, शारदा खरात, मदतनीस पुष्पा शिंदे, शोभा शिरसाट, तसेच निवृत्ती गायकवाड, पप्पू बनकर, देविदास पैठणे, आर्यन इंगळे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व गावकरी उपस्थित होते.

# महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघटना नागपूर तर्फे जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. सुरज मडावी यांचा जाहीर सत्कार

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे नागपूर :** नुकतेच अमरावती येथील जिल्हा ग्रंथालय अधिकारी मा.डॉ.सुरज मडावी साहेब यांची नागपूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी पदावर बदली होऊन आलेत. त्याबद्ल नागपूर जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह / नागपूर विभाग ग्रंथालय संघाचे सदस्य श्री श्यामराव श्यामकुवर तसेच सहकार्यवाह, शंकरराव लोहकरे तसेच ग्रंथालय कर्मचारी संघटनेचे नेते तथा महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघटनेचे सचिव,ग्रंथमित्र,नंदू बनसोड यांचे नेतृत्वात शिष्टमंडळ भेटले.मा.डां.सुरज मडावी साहेब यांचे



स्वागत नागपूर जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह /नागपूर विभाग ग्रंथालय संघाचे सदस्य श्री श्यामराव श्यामकुवर तसेच सहकार्यवाह, शंकरराव लोहकरे तसेच ग्रंथालय कर्मचारी संघटनेचे नेते तथा महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी संघटनेचे सचिव,ग्रंथमित्र,नंदू बनसोड यांचे नेतृत्वात शिष्टमंडळ भेटून ग्रंथभेट व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्याच प्रमाणे कै विद्यावती जोगळेकर वाचनालय तर्फे ग्रंथपाल,योगिता घंगरेकर, आरती राजकारणे प्रिती टांकसाळे, यांनी कै.विद्यावती जोगळेकर वाचनालयाची स्मरनिका भेट दिली.तसेच शिष्टमंडळाशी संवाद साधत ग्रंथालयाचे अडीअडचनिवर चर्चा केली. आपण ग्रंथालय कार्यकर्ते असल्याने सहकार्य करावे असें बोलले

या प्रसंगी नागपूर जिल्ह्यातील कार्यकर्ते मंडळी मोठया संख्येने उपस्थित होते. सौं दर्शना मस्के, स्मिता साने, माधुरी टेंभेकर, योगिता घंगरेकर, आरती राजकारणे,वीणा नाडेकर,पत्रकार डॉ. अतुल लामसोंगे, सचिन ढोले, गुरूदास बोरकर,चिंतामण राऊत,अनिल चनाखेकर,शील झोडापे, जगदीश गडपाल, निरंजन तिरपुडे, भीम शाहीर तथा पत्रकार प्रदीप कडबे, इत्यादी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# शांताराम खुडे यांना दिल्लीत डॉक्टरेट पदवी; उल्लेखनीय जनसेवेबद्दल विशेष राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** - समाजहितासाठी सातत्याने संघर्ष करणारे, गोरगरीब व वंचितांच्या हक्कासाठी शासन-प्रशासनाच्या दारात आवाज बुलंद करणारे आणि सामाजिक न्यायाच्या चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते शांताराम गणेश खुडे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेत २२ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथील विधान भवन सर्किट हाऊसमध्ये आयोजित भव्य सोहळ्यात डॉक्टरेट पदवी तसेच विशेष राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून शांताराम खुडे यांनी सामाजिक, शैक्षणिक व जनहिताच्या विविध प्रश्नांवर सातत्याने लढा उभारला आहे. भ्रष्टाचार, अन्याय, शासकीय



दुर्लक्ष आणि सर्व सामान्य नागरिकांच्या अडचणींविरोधात त्यांनी आंदोलने, मोर्चे, निवेदने, जनजागृती मोहिमा तसेच लोकशाही मार्गाने संघर्ष करत अनेक प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या या कार्यामुळे समाजात एक संवेदनशील आणि लढाऊ सामाजिक कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. शिवछत्रपती, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा वारसा पुढे नेत त्यांनी वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांच्या हक्कासाठी सातत्याने कार्य केले आहे. विशेषतः शिक्षण, सामाजिक न्याय, भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलने आणि नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांबाबत त्यांनी वेळोवेळी प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची या पूर्वीही विविध स्तरांवर दखल घेण्यात आली असून राष्ट्रीय गुणगौरव, महाराष्ट्र भूषण, समाजमित्र, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मूकनायक या सह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी त्यांचा गौरव करण्यात आला आहे. तसेच कोरोना महामारीच्या काळात गरजू नागरिकांना केलेल्या मदतकार्याबद्दलही त्यांना विविध सामाजिक संस्थांकडून सन्मानित करण्यात आले होते. सध्या शांताराम गणेश खुडे हे भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे प्रदेश उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असून, राज्यभरात जनजागृती, लोकहिताचे प्रश्न आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना जोपासण्यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत. दिल्ली येथे बहाल होणारी डॉक्टरेट पदवी आणि विशेष राष्ट्रीय पुरस्कार हा त्यांच्या दीर्घकालीन सामाजिक योगदानाचा सन्मान मानला जात असून, या गौरवाबद्दल पुणे जिल्ह्यासह राज्यभरातील सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्या वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पानवडोद बु. केंद्राच्या केंद्रप्रमुखपदी गजानन गव्हाणे

## विभागीय परीक्षेत यश संपादन केल्यामुळे नियुक्ती; शिक्षण क्षेत्रातून शुभेच्छा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ प्रामाणिकपणे व गुणवत्तापूर्ण सेवा बजावणारे शिक्षक गजानन गव्हाणे यांची सिल्लोड तालुक्यातील पानवडोद बु. केंद्राच्या केंद्रप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रप्रमुख विभागीय स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केल्यानंतर त्यांची ही नियुक्ती झाल्याने शिक्षण क्षेत्रात आनंदाचे वातावरण असून शिक्षक, अधिकारी आणि नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मूळचे बोधवड येथील असलेल्या गजानन गव्हाणे यांनी प्राथमिक शिक्षण वांगी जिल्हा परिषद शाळेत, तर माध्यमिक शिक्षण एस. बी. विद्यालय, भराडी येथे पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी जळगाव येथे उच्च शिक्षण घेतले. शिक्षणाप्रती असलेली जिद्द, अभ्यासू वृत्ती आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर त्यांनी अध्यापन क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.



सन २०१० मध्ये शिक्षक म्हणून सेवेत रुजू झाल्यानंतर त्यांनी पानवडोद, धोत्रा आदी शाळांमध्ये अत्यंत निष्ठेने व जबाबदारीने अध्यापन केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, गुणवत्तापूर्ण शिक्षण, शैक्षणिक उपक्रमांना चालना आणि शाळांमध्ये सकारात्मक शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या कार्यकाळात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करण्यासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले.

अलीकडेच झालेल्या केंद्रप्रमुख विभागीय स्पर्धा परीक्षेत त्यांनी उल्लेखनीय यश मिळविले. त्यांच्या अनुभव, प्रशासकीय क्षमता आणि शैक्षणिक नेतृत्वाचा विचार करून शिक्षण विभागाने त्यांच्यावर पानवडोद बु. केंद्राची धुरा सोपविली आहे. गव्हाणे यांच्या नियुक्तीमुळे केंद्रांतर्गत येणाऱ्या शाळांना सक्षम नेतृत्व मिळणार असून शिक्षकांना मार्गदर्शन, शैक्षणिक गुणवत्तेत वाढ आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास शिक्षण क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल शिक्षण विभागातील अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# धोक्यात असणारा पत्रकारितेचा धर्म वाचवा : संदीप काळे

## भंडाऱ्यात विदर्भातील १ हजार पत्रकारांच्या उपस्थितीत 'पत्रकार हक्क परिषद'

### 'व्हॉईस ऑफ मीडिया' पुढाकारातून विदर्भात पत्रकारांसाठी कल्याणकारी योजना

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकिया भंडारा जिल्हा प्रीनीधी भंडारा :** "संपूर्ण जगाच्या लोकशाहीचा आणि समाजव्यवस्थेचा आधार पत्रकारितेवर आहे. समाजाला दिशा देणारी, सत्तेला जाब विचारणारी आणि जनतेचा आवाज बनणारी पत्रकारिता आज अनेक अडचणींच्या विळख्यात सापडली आहे. राजकीय दबाव, सामाजिक आव्हाने आणि बदलत्या परिस्थितीमुळे पत्रकारिता आपला मूळ धर्म गमावण्याच्या उंबरठ्यावर उभी आहे. त्यामुळे धोक्यात आलेला पत्रकारितेचा धर्म वाचविण्यासाठी सर्व पत्रकार, संपादक, माध्यम संस्थांचे प्रतिनिधी आणि पत्रकारितेशी संबंधित प्रत्येक घटकाने एकत्र येऊन संघर्ष उभारला पाहिजे. ही केवळ पत्रकारांची लढाई नसून लोकशाहीच्या अस्तित्वाची लढाई आहे," असे भावनिक आवाहन व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्हीओएम इंटरनॅशनल फोरमचे संस्थापक तथा आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी केले.

भंडारा येथील पोलीस बहुउद्देशीय सभागृहात आयोजित विदर्भस्तरीय 'पत्रकार हक्क परिषद' व कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या परिषदेला विदर्भातील एक हजारावून अधिक पत्रकार पदाधिकारी यांची उपस्थिती लाभली. पत्रकारांच्या हक्कांचे संरक्षण, माध्यमांसमोरील सध्याची आव्हाने, बदलत्या माध्यमविश्वातील जबाबदाऱ्या आणि संघटित पत्रकार शक्तीची आवश्यकता यावर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

"पत्रकारिता ही केवळ उपजीविकेचे साधन नाही, तर समाजाप्रती असलेली नैतिक जबाबदारी आहे. सत्याचा शोध घेण्यासाठी अनेक पत्रकार स्वतःच्या




'व्हॉईस ऑफ मीडिया' पुढाकारातून विदर्भात पत्रकारांसाठी कल्याणकारी योजनाची सुरुवात आणि पत्रकार हक्क परिषदचे उद्घाटन 'व्हॉईस ऑफ मीडिया', 'व्हीओएम इंटरनॅशनल फोरमचे संस्थापक तथा आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी केले,राज्य कार्याध्यक्ष नरेंद्र देशमुख, विदर्भ विभागाध्यक्ष व्यंकटेश दुडमवार, यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर यावेळी उपस्थित होते

जीवाची, कुटुंबाची आणि भविष्याची पर्वा न करता काम करतात. मात्र आज पत्रकारांवर हल्ले होतात, खोटे गुन्हे दाखल होतात, आर्थिक असुरक्षितता वाढत आहे आणि अनेकांना मूलभूत संरक्षणही मिळत नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी संघटितपणे उभे राहणे ही काळाची गरज आहे," असेही काळे म्हणाले.

ते पुढे म्हणाले, "आपण येथे केवळ समस्या मांडण्यासाठी जमलो नाही, तर त्यावर उपाय शोधण्यासाठी आलो आहोत. संघटित पत्रकार हीच सर्वात मोठी ताकद आहे. आपण एकजुटीने उभे राहिलो तर कोणतीही शक्ती पत्रकारितेचा आवाज दाबू शकणार नाही. व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्हीओएम इंटरनॅशनल फोरमने पत्रकारांचे घर, आरोग्य, शिक्षण, कौशल्यविकास आणि सामाजिक सुरक्षेसाठी सातत्याने काम केले आहे. मात्र हा प्रवास एका संस्थेचा नसून प्रत्येक पत्रकाराचा आहे."

"आपण स्पर्धक नाही, तर सहकारी आहोत. विचारभिन्नता असू शकते, पण पत्रकारितेच्या हितासाठी आपण एकदिलाने उभे राहिले पाहिजे. पत्रकारिता वाचली तरच लोकशाही मजबूत राहील आणि लोकशाही मजबूत राहिली तरच सामान्य नागरिकाचा आवाज जिवंत राहील," असे आवाहन करत त्यांनी उपस्थित पत्रकारांना पत्रकारितेच्या सन्मान, सुरक्षितता आणि स्वातंत्र्यासाठी एकत्रितपणे लढण्याचा संकल्प करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला व्हॉईस ऑफ मीडियाचे राज्य कार्याध्यक्ष नरेंद्र देशमुख, विदर्भ विभागाध्यक्ष व्यंकटेश दुडमवार, भंडारा जिल्हाध्यक्ष शशिकांत भोयर, जिल्हा अध्यक्ष नागपूर दिलीप घोरमारे, गडचिरोली जिल्हा प्रवक्ते नसिर हाशमी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी आणि सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या. 'व्हॉईस ऑफ मीडिया' पुढाकारातून विदर्भात पत्रकारांसाठी कल्याणकारी योजना हाती घेण्यात आल्या ज्यातून विमा, मुलांचे शिक्षण यांची सुरुवात करण्यात आली.

विशेष अतिथी म्हणून जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष सुनील फुंडे, उद्योजक जयंत गज्जर, जॅकी रावलानी, डिम्पल मल्होत्रा, रूपेश टांगले तसेच जिल्हाधिकारी सावन कुमार आणि जिल्हा पोलीस अधीक्षक नुरूल हसन यांनी उपस्थिती लावली. सायंकाळी पत्रकारांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. खासदार डॉ. प्रशांत पडोळे, आमदार डॉ. परिणय फुके, नरेंद्र भोंडेकर, नाना पटोले, राजू कारेमोरे, जिल्हा परिषद अध्यक्षा कविता उईके, माजी खासदार सुनील मेंढे, माजी आमदार चरण वाघमारे यांच्यासह अनेक मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते.

यावेळी बॉलिवूड गायिका राधा खुळे आणि प्रणय सतलज यांच्या "पाटलांचा बैलगाडा" या संगीतमय कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भंडारा जिल्हाध्यक्ष शशिकांत भोयर व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## खांदा कॉलनीत रस्त्यावरील वाढलेल्या झाडांच्या फांद्या त्वरित तोडाव्यात नगरसेविका सितताई पाटील यांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी प्रतिनिधी :** खांदा कॉलनीत जीर्ण झाडांच्या रस्त्यावरील वाढलेल्या फांद्या अनेक ठिकाणी दिसून येत आहेत परिसरातील नागरिकांनी मागणी करुन सुध्दा पनवेल महापालिकेने याकडे दुर्लक्ष केले आहे परिसरात नेमलेले ठेकेदार नीट काम करत नसल्याने प्रचंड पावसात या फांद्या व जीर्ण झाडे पडल्याच्या घटना मागील दोन खांदा कॉलनीत घडत आहेत



यात काही नागरिकांच्या गाड्याचे नुकसान देखील झाले आहे या वाढलेल्या फांद्या मुळे वीज वितरणाच्य केबलला देखील धोका निर्माण झाला आहे तसेच फांद्या पडून घरांचे वाहणाचे नुकसान होण्याची शक्यता असून पनवेल महापालिकेने ठेकेदाराकडून रस्त्यांवरील वाढलेल्या झाडांच्या फांद्या त्वरित तोडाव्यात अशी मागणी नगरसेविका सिताताई पाटील यांनी पनवेल महापालिके कडे एका पत्राद्वारे केली आहे कोणताही अपघात होऊ नये म्हणून पनवेल महापालिकेने तातडीने कामाला सुरुवात करावी अशी मागणी केली आहे

## पियुष फर्निचर मालक भगवान पुडके यांच्या दुकानातून २ महिन्यापूर्वी 75000 ची चोरी

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा** -मोहाडी पोलीस स्टेशन हद्दीत पियुष फर्निचर या नावाने दुकान असून दुकान असून ही दुकान 2011 पासून सुरू आहे. मालक भगवान पुडके असून यांच्या दुकानातून दिनांक 27/ 4 /2026 ला पहाटे ४ वाजेच्या जवळपास 75 हजार रुपयाची चोरी झाली. आरोपी सीसी टीव्ही फुटेज मध्ये दिसत आहेत .परंतु आज २ महिन्याचा कालावधी उलटला परंतु मोहाडी पोलिसांचे तपासाच्या दिशेने चक्र फिरताना दिसत नाही.दुकान ते पोलीस पोलीस



स्टेशन अंतर हे १ किलोमीटरच्या आत असून अजून पर्यंत पियुष फर्निचर चे मालक भगवान पुडके यांना न्याय मिळालेला नाही. याबाबत आज दिनांक ८ जुलै 20 26 ला पत्रकार संजीव भांबोरे यांनी मोहाडी पोलीस स्टेशनला 10 वाजून 49 मिनिटांनी प्रत्येक भेट देऊन ठाणेदार सुरेंद्र बेलखेडे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली असता सदर प्रकरणाबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की आंधळगाव पोलीस स्टेशन व मोहाडी पोलीस स्टेशन अंतर्गत चौकशी सुरू असल्याचे त्यांनी सदर प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

सदर चोरी प्रकरणात भंडारा जिल्ह्याचे लक्ष लागले असून मोहाडी पोलीस स्टेशन आरोपीला ताब्यात घेण्यात किती दिवस अजून लावते याकडे मोहाडी तालुक्यातील जनतेचे लक्ष लागून आहे.

## देगाव (कु.) येथे भारत निवडणूक आयोगाच्या S.I.R. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाला गती

### तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांचे नियोजनबद्ध कामावर भर'

**दैनिक युवक आधार**

**पत्रकार गंगाधर कदम अर्धापूर ग्रामीण तालुका प्रतिनिधी** : भारत निवडणूक आयोगाच्या Special Intensive Revision (S.I.R.) विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदार यादी अधिक अचूक, पारदर्शक व त्रुटीरहित करण्याच्या उद्देशाने देगाव (कु.) येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत कार्यालय आणि अंगणवाडीच्या माध्यमातून काम वेगाने व नियोजनबद्ध पद्धतीने सुरू आहे.

आज, दि. ११ जुलै २०२६ रोजी तहसीलदार अर्धापूर श्री. रेणुकादास देवणीकर व गटविकास अधिकारी श्री. यु.डी. तोटावाड यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देगाव (कु.) येथे भेट देऊन सुरू असलेल्या कामाची सविस्तर पाहणी केली.

यावेळी सरपंच प्रतिनिधी बालाजी फुलारी, उपसरपंच संतोष कदम, पोलीस पाटील दत्तात्रय चिंचडवाड, ग्रामविकास अधिकारी श्रीमती आशाताई शिंदे, मुख्याध्यापक अनुरथ कसबे, स्वस्त धान्य दुकानदार अनिकेत कदम, अंगणवाडी







पर्यवेक्षिका श्रीमती गायकवाड,मंडळ अधिकारी मालेगाव श्री. दुधाटे, सर्व BLO, अंगणवाडी सेविका तसेच ग्रामपंचायत कर्मचारी शिवाजी लढे, उमाकांत कदम उपस्थित होते.

तहसीलदार श्री. रेणुकादास देवणीकर यांनी उपस्थित सर्व BLO यांना सखोल पुनर्निरीक्षण कार्यक्रमाचे महत्त्व, प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्याची जबाबदारी, अचूक माहिती संकलन, वेळेत काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक नियोजन आणि नागरिकांशी समन्वय याबाबत अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे संपूर्ण यंत्रणेमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

यावेळी सरपंच प्रतिनिधी बालाजी फुलारी आणि उपसरपंच संतोष कदम यांनी ग्रामपंचायत देगाव (कु.) प्रशासन, BLO व संबंधित सर्व कर्मचाऱ्यांसोबत खांद्याला खांदा लावून काम करेल, अशी ग्वाही देत या लोकशाहीच्या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी पूर्ण सहकार्याची भूमिका स्पष्ट केली.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रशासन, ग्रामपंचायत, शाळा व अंगणवाडी यांच्यातील समन्वयातून सुरू असलेले हे कार्य मतदार यादी शुद्धीकरण आणि लोकशाही अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरत असून, तहसीलदार श्री. रेणुकादास देवणीकर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली अर्धापूर तालुक्यात हा उपक्रम आदर्शवत पद्धतीने राबविला जात असल्याचे चित्र दिसून आले.

## सोशल मीडियावर बौद्ध समाजाचा अवमान; आरोपींवर कठोर कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी,/ राजू गायकवाड (मोहदरी)** : सोशल मीडियाचा वापर करून महार (बौद्ध) समाज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी तसेच "जय भीम" या अभिवादनाचा अवमान करत जातीय द्वेष पसरविणाऱ्या आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी आजाद समाज पार्टी (कां.), युवा च्या वतीने पुसद शहर पोलीस ठाण्यात निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदनानुसार, दिनांक ९ जुलै २०२६ रोजी रात्री १०.११ वाजता आरोपी रुपेश बोंबले यांच्या "SONU_PATIL_001" या इन्स्टाग्राम आयडीवरून झालेल्या Instagram LIVE दरम्यान आरोपी योगेश कल्याणकर यांनी महार (बौद्ध) समाज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आणि "जय भीम" या अभिवादनाबाबत अत्यंत आक्षेपार्ह, जातीवाचक व चिथावणीखोर वक्तव्ये करून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप




करण्यात आला आहे.

या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल झाल्याने त्याचा जलद, निष्पक्ष व प्रभावी तपास करून आरोपींना कायद्यानुसार कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच सोशल मीडियावर जातीय विद्वेष पसरविणाऱ्या प्रवृत्तींवर कठोर कारवाई करण्यासाठी सायबर यंत्रणेमार्फत विशेष देखरेख ठेवण्याचीही मागणी निवेदनातून करण्यात आली.

आजाद समाज पार्टी (कां.) पुसदने या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करत, समाजात जातीय तेढ निर्माण करणाऱ्या कोणत्याही प्रवृत्तीला कायद्याच्या चौकटीत कठोर उत्तर देण्याची गरज असल्याचे नमूद केले. आरोपींवर तातडीने कठोर कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला.

यावेळी राजकुमार भगत आजाद समाज पार्टी का. युवा जिल्हाध्यक्ष यवतमाळ, विशाल डाके आजाद समाज पार्टी का. युवा जिल्हा महासचिव यवतमाळ, राहुल धुळे, अजय लोखंडे भीम आर्मी तालुका अध्यक्ष, वैभव सूर्यवंशी भीम आर्मी तालुका उपाध्यक्ष, आकाश चवरे, प्रसाद खंदारे, शुभम गवई, आकाश धुळे, वैभव खरतडे, तेजस बोखारे, सुमित आढाव, शांतिशील जाधव, संदेश कांबळे, राज कांबळे, इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

## "पिलीव ग्रामपंचायतचे प्रशासक मच्छिंद्र मिसाळ यांचा सेवानिवृत्ती निमित्त निरोप समारंभ"

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी रघुनाथ देवकर** : माळशिरस पंचायत समितीचे सामान्य प्रशासन विभागाचे विस्तार अधिकारी तथा पिलीव ग्रामपंचायतचे प्रशासक श्री मच्छिंद्र मिसाळ यांची सेवानिवृत्ती झाल्या प्रित्यर्थ पिलीव ग्रामपंचायतच्या वतीने ग्रामपंचायत अधिकारी भंडलकर भाऊसाहेब व स्टाफने पिलीव ग्रामपंचायत



कार्यालयात निरोप समारंभाचे आयोजन करून त्यांचा सन्मान जेष्ठ पत्रकार दामोदर लोखंडे, रघुनाथ देवकर, समशेरसिंग राजपूत, रवींद्र भैस, सेवानिवृत्त आरोग्य कर्मचारी अर्जुन रुपनर यांचे उपस्थितीत शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन करण्यात आला. यावेळी सोमनाथ देशमुख, विजय देशमुख, लखन काळे, करांडे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते. श्री मच्छिंद्र मिसाळ यांनी पिलीव ग्रामपंचायत मध्ये प्रशासकीय पदावरती काम करीत असताना सर्व ग्रामस्थांना विश्वासात घेऊन आपली सेवा प्रामाणिकपणे बजावल्याचे अनेकांनी सांगितले. त्याचवेळी श्री मिसाळ यांनी पिलीव ग्रामपंचायत ची सेवा करत असताना मला माझे सहकारी ग्रामपंचायत अधिकारी भंडलकर, सर्व कर्मचारी त्याचबरोबर सर्व ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले आणि पिलीवची सेवा माझ्या आयुष्यामध्ये स्मरणात राहील अशा प्रकारे सन्मानाला उत्तर देताना आपले विचार व्यक्त केले.

## आ. विक्रांत दादा पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त राजीव गांधी मैदान, नवीन पनवेल येथे रबरी बॉल पावसाळी क्रिकेट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : आमदार विक्रांत दादा पाटील यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त राजीव गांधी मैदान, नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आलेल्या रबरी बॉल पावसाळी क्रिकेट स्पर्धेला खेळाडू तसेच क्रीडाप्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना आमदार विक्रांत दादा पाटील यांनी सांगितले की, "क्रिकेट हा केवळ मनोरंजनाचा खेळ नसून युवकांमध्ये शिस्त, जिद्द, संघभावना आणि सकारात्मक विचार रुजविण्याचे प्रभावी माध्यम आहे. अशा स्पर्धांमधून अनेक होतकरू खेळाडूंना आपले कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळते आणि त्यांचा आत्मविश्वासही अधिक दृढ होतो."

पनवेल परिसरातील क्रीडा संस्कृती अधिक बळकट व्हावी, युवकांना त्यांच्या गुणवत्तेला न्याय देणारे व्यासपीठ उपलब्ध व्हावे आणि नवोदित खेळाडूंना सातत्याने प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

या कार्यक्रमास आमदार विक्रांत दादा पाटील युवाशक्ती संघाचे अध्यक्ष आकाशजी पाटील, अशोकजी भोईर,






संदीपजी मोहिते, भूषणजी पाटेकर, नितेशजी म्हात्रे, आदेशजी पाटील, समीरजी मुंडे, जितू काटकरजी, राज भोईरजी आणि सचिनजी कुलकर्णी यांच्यासह अनेक मान्यवर व क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन व यशस्वी आयोजन केल्याबद्दल आमदार विक्रांत दादा पाटील युवाशक्ती संघाचे संदेश पाटील आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंना त्यांच्या भावी क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.